# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०६/०५/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील पारशिवनी येथे दिनांक ०६/०४/२०२२ चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— निर्मला आत्माराम लांजेवार, वय ५७ वर्ष, रा. करंभाड ह.मु पारशिवनी व आरोपी नामे— रविंद्र आत्माराम लांजेवार, रा. करंभाड हे आई व मुलगा असुन वेगवेगळे ठिकाणी राहतात. फिर्यादी हीने आरोपीला म्हटले की, 'तुरी दळुन झाले असेल तु चक्की वरून दाळ घेवुन ये' तेव्हा आरोपी याने म्हटले की, 'मी चक्कीवर जात नाही व दाळ आणत नाही' असे म्हणुन दारूच्या नशेत फिर्यादीस शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली व हातभुक्याने व लाथाने डाव्या हाताला मारले. त्यामुळ फॅक्चर झाल्याचे डॉक्टरांचा अभीप्राय दिल्याने डॉक्टरी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नरेश रामटेके ९८९०१००७१५ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. भिवापुर** :— दिनांक ०५/०५/२०२२ चे ०१.३० वा. चे सुमारास पो.स्टे. भिवापुर हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही लग्न असल्याने आपले भावाचे घरी गेली होती. घटना ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीची मुलगी ही बाथरूमला जाते असे सांगुन गेली परंतु ती परत न आल्याने तिचा शोध घेतला मिळुन आली नाही. फिर्यादीचा मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री शरद भस्मे मो.क्र. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर